विषय निबंध
क्र. १७३५

…णासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।
…डावे । बहुत जन ।। —श्रीसमर्थ

# उदंड देशाटन करावें!

१६



REFBK-0012295

बहुश्रुत

वितरक : गोकुळ मासिक प्रकाशन
११९४ सदाशिव, पावन मारुती चौक, पुणें २

बहुश्रुत

१६

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळप्रत.
अनुक्रम 38460 वि: निबंध
क्रमांक 12395 नों दि 18.3.63

# उदंड देशाटण करावें

सुधाकर प्रभु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क. 12295
संग्रह (स्थळ प्रत)

मूल्य ५० नये पैसे

REFBK-0012295
REFBK-0012295

...लशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २

वितरक : गोकुळ मासिक प्रकाशन
११९४, सदाशिव पेठ, पुणें २

संपादक: अमरेन्द्र गाडगीळ

श्री : ३७४ [ ९–६२ ]
卐
© १९६२
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
卐
आवृत्ति पहिली :
शके १८८४
सन १९६२

बहुश्रुत पुस्तकमाला : १६

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा.लि.करितां,
३,राउंड बिल्डिंग,मुंबई २
卐
मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय
४३९, शनिवार, पुणें २.

## मा ला - प रि च य

दर आठवड्याला एक नवें पुस्तक वाचकांच्या हातीं देणारी ही पुस्तक-माला साधारणतः सर्व-सामान्य वाचकासाठीं असून विशेषतः वरच्या वर्गांतील शालेय विद्यार्थी व शिक्षक यांच्याकरितां आहे. यांतून भिन्न रुचीच्या वाचकांनाहि भरपूर विविध माहिती, नवे विषय, कांहीं मनोरंजन व उद्‌बोधन यांचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा आहे.

## या पुस्तकासंबंधीं –

भटकन्तीचें वेड लागावें लागतें; आणि तें लहानपणीं विद्यार्थीदशेंत लागलेलेंच बरें. कारण त्या वेळीं सुदृढ प्रकृति, अमाप उत्साह आणि उदंड वेळ उपलब्ध असतो. एकदां हिंडायला लागा, म्हणजे त्यांतला आनंद समजेल, मौज कळेल. पण त्यासाठीं प्रथम कूपमंडूकवृत्ती सोडून घराच्या बाहेर पडलें पाहिजे. चार भिंती सोडल्या कीं चारी वाटा मोकळ्याच आहेत; आणि चतुर्विध पुरुषार्थहि !

## आगामी पुस्तकें :

१७. एक अविस्मरणीय सामना
१८. पौरुषाची वाट
१९. शरीरमाद्यम्.....
२०. दिव्या गीर्वाण-भारती

# उदंड देशाटण करावें !

दा. क्र. १२२९५

## चला भ्रमंतीला | १

पुण्यसलीला गंगेचें विशाल पात्र. समोर पूर्वेला उदयाचलावर येणारा सविता आणि भोंवतालचें सस्यशामल आसमन्त. भ्रमंतीनें आलेल्या साऱ्या शिणवट्याचा विसर पाडतें. जान्हवीचें निर्मल जल हलक्या हलक्या लाटांनीं किनाऱ्यावर येऊन फुटत असतें. आपण कंबरभर पाण्यांत येऊन उभें रहावें. जान्हवीजलांत बुडी मारावी आणि ओंजळींत तें पवित्र गंगाजल घेऊन उगवत्या हंसऱ्या सवित्याला अर्घ्य द्यावें.

हजारों वर्षांपूर्वी आदि आर्य असाच हातांत अर्घ्य घेऊन उभा राहिला असेल. भ्रमंतीचें व्रत घेतलेले हजारों आर्य खैबर नि बोलान ओलांडून भारतांत आले आणि या गंगातीरावर स्थिर झाले. देशाटनाला निघालेल्या या आर्यांनीं आपलें मूळ वसतिस्थान सोडल्यावर अनेक भूप्रदेश पाहिले. भ्रमंतीला निघण्यापूर्वी त्यांनीं अफाट प्रदेश पायाखालीं घातला. भारतांत आल्यावर सप्तसिंधूचा प्रदेश ओलांडून ते पुढे आले. गंगेच्या आसमन्तांत स्थिर झाले.

भ्रमंतीच्या कालांत घेतलेल्या बऱ्यावाईट अनुभवांच्या पाथेयावर त्यांनीं मग एका नव्या निर्माणाला प्रारंभ केला. या गंगाकांठावर त्यांनीं मग ज्ञानयज्ञ आरंभिला. आणि याच ज्ञानसत्रांतून जगाच्या आदिकारणापासून मानवाच्या सामाजिक धर्मापर्यंतचीं गूढतत्त्वें नि समतोल व्यवहार यांची उकल झाली; आध्यात्मिक परमोच्च तत्त्वें सांगणारी नि त्यानुरूप जीवन घडविणारी थोर भारतीय संस्कृति जन्माला आली.

पुण्यपावन गंगेच्या पात्रांत क्षणभर उभें राहतांच समोरच्या पाण्यांत आपल्या अभिमानाचा हा वारसा प्रतिबिंबित होतो. ज्यांनीं हें आपल्या थोर संस्कृतीचें मंगलधाम बांधलें त्यांची जात होती भ्रमंतीकारांची, भटक्यांची. उदंड देशाटन करून, नाना अनुभव जोपासत, हिमालयाच्या शिखरापासून दक्षिण सागराच्या टोंकापर्यंत हे भ्रमंतीकार, ही घुमक्कड मंडळी हिंडत राहिली. "जें जें आपणांस ठावें तें तें दुसऱ्यासी शिकवावें" हा संदेश आपल्याबरोबर घेऊन एकटा एक पाऊल ते पुढें टाकीत राहिले शेंकडों, हजारों मैल लांबीरुंदीच्या आपल्या या भारतांत मंदिरें, तीर्थें, समाध्या यांच्या रूपानें यांच्या भ्रमंतीचीं पदचिन्हें आजहि उभीं आहेत. या पदचिन्हांचा संदेश एकच आहे :

"आपला हा विशाल भारत देश. नाना प्रकारच्या भूभागानें नटलेला. निसर्गाच्या नाना कळांनीं रंगलेला. हवा, पाणी, अन्न, वस्त्र यांच्या वैचित्र्यानें फुललेला. विविध जमातींनीं भरलेला. त्यांच्या विविध अस्मितांनीं पोसलेला. असा आपला हा प्रिय भारत ! या देशाच्या पाण्याला, हवेला, वाऱ्याला आणि मातीलाहि प्रेमाचा, सर्वांभूतीं प्रेमाचा सुगंध आहे, तसाच दुष्ट-दुरितांच्या निर्दालनाचा तेजस्वी स्पर्श आहे. असा हा देश बघा. खूप फिरा, खूप पहा. भ्रमंतींत मिळालेला अनुभव आपल्यामागून येणाऱ्या पिढीला द्या. आपल्या अनुभवांचें पाथेय त्यांच्या ओंजळींत टाका. त्या हवेचा, पाण्याचा, मातीचा सुगंध पिण्यासाठीं आणि स्पर्श जाणवून घेण्यासाठीं त्यांनाहि देशभर भटकंतीला जाऊं द्या. जाऊं द्या त्यांनाहि उदंड देशाटनासाठीं, भारताच्या भ्रमंतीसाठीं." त्या पदचिन्हांचा हाच संदेश–"जयतु जयतु घुमक्कड-पन्था।"

त्या गगनचुंबी हिमनगाच्या स्कंधावरून खालीं झेंपावणाऱ्या जान्हवीचा संदेश हाच.... सागराला दिठीं मिठीं भेटायला निघालेल्या गंगेचाहि संदेश

हाच....'उदंड देशाटण करा. थांबला तो संपला. जो जागेला चिकटून राहिला तो कुजला. जो डबक्यांत अडकून पडला तो कूपमंडुक! सारखे गतिशील रहा.'

तुम्हांला तें सुभाषित माहीत आहे ना? 'शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः।' जो झोपतो त्याचें दैवहि झोपतें; जो सदा चालता रहातो त्याचें दैवहि चालत रहातें—त्याची चलती चालते. भ्रमंती म्हणजे ज्ञान, उन्नति आणि प्रगति. ज्यांनीं भ्रमंती केली त्या व्यक्ती आणि जाती सतत पुढेंच गेल्या; वैभवाच्या धनी झाल्या. ज्यांनीं या घुमक्कडीला, भ्रमंतीला दूर सारलें त्यांना विनाशाचा वारसा मिळाला. भ्रमंतीकारांनीं या देशांतील संस्कृति त्या देशांत पोहोंचवली. चांगलें आणलें, चांगलें दिलें. अशी ही भ्रमंतीची किमया!

आपला देश आपल्या डोळ्यांनीं आपण पाहिला पाहिजे. देशांतील वाऱ्या-ताऱ्याचें प्रेम आपल्याला वाटलें पाहिजे. जें आपण पहातों, अनुभवतों त्यानें त्याच्यावरील आपलें प्रेम वाढतें. देशप्रेमासाठीं देश पाहिला पाहिजे आणि देश पाहण्यासाठीं देशप्रेम असलें पाहिजे. वृद्ध मातामहाचा ध्यास घेणाऱ्या नातवंडांच्या प्रेमानें ही भ्रमंती झाली पाहिजे. भ्रमंती ही अनुभवाची शाळा आहे. शाळेच्या चार भिंतींत मिळालेलें ज्ञान कसोटीवर घांसून पहाण्याची भ्रमंती ही प्रयोगशाळा आहे.

## असा आमचा भ्रमंतीचा वारसा | २

“ नारायण ! नारायण ! ” असें नित्य नामस्मरण करीत तिन्ही लोकांची भ्रमंती करणारे महर्षी नारद सगळ्यांकडून सन्मानिले गेले. कुठेंहि जा, त्यांचा आदरसत्कार व्हायचा. राजेघराण्यांतील अन्तःपुरापासून दरवडेखोरांच्या गुहेपर्यंत कुठेंहि त्यांना मुक्तप्रवेश असायचा. देवदानव, सुरासुर त्यांना सारखेच मान द्यायचे. स्वर्ग, पृथ्वी व पाताळ या तिन्ही लोकांत त्यांची भ्रमंती. कुठें नवल पाहिलें, अघटित बघितलें; अद्‌भुत, भव्य, उज्ज्वल पाहिलें. त्या साऱ्यांची हे मुनिश्रेष्ठ दखल घ्यायचे. चांगल्याला वानायचे आणि जिथें जातील तिथें त्यांची कीर्ति नेऊन पोहोंचवायचे.

या विशाल नि प्राचीन भरतखंडांत नाना ऋषि-महर्षि नवनिर्माणाचा प्रयोग करून गेले. आपल्याला सांपडलेल्या सत्याच्या प्रसारासाठीं ते देशाचे कानेकोपरे हिंडले. रामायण-महाभारतांतील भूभागांचीं वर्णनें वाचलीं तरी याची साक्ष पटते. हे ऋषि-महर्षी सारखे फिरत होते. भ्रमंती हाच त्यांचा धर्म बनला होता. निबिड वनें, दुर्लंघ्य पर्वतश्रेणी, अफाट नद्या त्यांच्या भ्रमंतीला अडवूं शकत नव्हत्या. भगवान् विवस्वानासारख्या अनेक महात्म्यांनीं हेंच कार्य अंगिकारिलें होतें. संघच्या संघ घेऊन ते भारतभ्रमंतीला निघाले होते. अशा भ्रमंतींत त्यांनीं सूर्योदय पाहिले, सूर्यास्त पाहिले. निसर्गाची विविधता पाहिली. या विविधतेनें त्यांच्या मुखांतून स्तुतिसूक्तें बाहेर पडलीं. निबिड अंधकारांतून प्रभा फाकवणाऱ्या उषेचीं सूक्तें. जलधारांनीं भूमातेला भिजवून चिंब करणाऱ्या वरुणाची सूक्तें. हीं सूक्तें ज्यांनीं ऐकलीं त्यांनीं तीं ध्यानांत ठेवलीं, मुखोद्गत केलीं.

केवळ ऋषिमुनी नव्हे तर राजे लोकांनींहि हा भ्रमंतीधर्म श्रेष्ठ मानला. भगवान श्रीकृष्ण व त्याचा सखा बलराम हे पट्टीचे भ्रमंतीभक्त होते.

देशांतील अनेक ठिकाणच्या संस्कृतिकेंद्रांत राजेरजवाड्यांचीं मुलें शिक्षण घ्यायचीं. दूरदूरच्या ऋषिमुनींच्या आश्रमाचा, ज्ञानपीठांचा तपास काढीत ही मंडळी तिथें जायची. कशासाठीं? ज्ञानासाठीं. शिक्षणकालानंतर परत तीच भ्रमंती चालू असायची. गुरुदक्षिणा आणि तीहि स्वतःच्या बळावर स्वतः मिळवून देण्यासाठीं, गुरुऋणांतून मुक्त होण्यासाठीं ठिक-ठिकाणीं राजांकडे हे विद्यासंपन्न विद्यार्थी जात. या विद्यार्थ्यांना या देशाच्या विशाल भूभागाची कल्पना यावी, चालीरीतींची माहिती मिळावी, लोकरीती-जनरीतीचा परिचय व्हावा, थोर परंपरा समजाव्यात हाच त्या भ्रमंतींतील उद्देश होता. प्रांतोप्रांतींच्या राजांकडून अजिंक्यपत्रें मिळवीत पंडितवर प्रवासाला निघत असत. आसेतुहिमाचल भारतांतील कोणत्याहि भूभागावर असलेलें ज्ञानपीठ त्या वेळीं साऱ्या भारताचेंच मानलें जायचें. भारताच्या कानाकोपऱ्यांतून विद्यार्थी तिथें गर्दी करायचे आणि ज्ञान संपादन करून 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' हा संदेश घेऊन भारत-भ्रमंती करायचे.

ज्यांनीं जगाला धर्माची देणगी दिली ते जगांतील सगळे धर्मसंस्थापक पट्टीचे भ्रमंतीकार होते. गौतमबुद्धानें तर पायाला चक्रच बांधलें होतें. जैनधर्म-संस्थापक महावीर 'करतल भिक्षा तरुतल वास' हाच जप घेऊन निघालेले होते. तीच गोष्ट शंकराचार्यांची. केरळच्या या धर्म-धुरीणाला कोणतीच भूमि वर्ज्य नव्हती. वास्को–ड–गामासारख्या परकीयाचे पाय या भूमीवर पडण्याअगोदर आद्य शंकराचार्यांचे शिष्य हिमालय पार करून रूसमध्यें पोहोंचले होते. भारतांतील चारी धाम यात्रांवर संतोष न मानतां ते हिमनगाचीं दऱ्याखोरीं ओलांडून फार पलीकडे गेले होते.

या भ्रमंतीकारांनीं स्थापन केलेल्या ज्ञानपीठांचा कीर्तिपरिमल अशाच दुसऱ्या कांहीं भ्रमंतीकारांनीं देशा-परदेशांत नेऊन पोहोंचविला; आणि

ह्युएनत्संगासारखे ज्ञानपिपासु भ्रमंती करत येथें आले. जावा-सुमात्रामध्यें आज भारतीय संस्कृति एकजीव झालेली दिसते याचें श्रेय या देशांतील त्यावेळच्या भ्रमंतीकारांनाच आहे. आमच्या जीवनव्यापी संस्कृतीचा परिमल या थोर भ्रमंतीकारांनीं तिथें पोहोंचविला. अनेक संस्कृत ग्रंथ चिनी भाषेंत अनुवादून देणारा भ्रमंतीश्रेष्ठ कुमारजीव, काम्बोजमध्यें भारतीय संस्कृतीची आणि वैदिक धर्माची ध्वजा नेणारा दिवाकरभट्ट असे कित्येक भारतीय भ्रमंतीश्रेष्ठ असतील. या देशाची संजीवक श्रेष्ठ संस्कृति प्रसारण्याचें काम त्यांच्या देशाटनानें केलें.

पुढें भारत ही भ्रमंतीची शिकवण विसरला. हा भारतीय धर्म विसरला. चालणें हा माणसाचा धर्म आहे, ही पूर्वजांची शिकवण तो विसरला. आपल्याभोंवतीं वर्तुळ आंखून तों त्यांतच गुंगला. कूपमंडुक बनला. भ्रमंतीच्या ओजस्वी संदेशाचा त्याला विसर पडला. आपल्या महाराष्ट्राचीहि तीच गत झाली. चिरयात्री परशुरामानें दिलेली शिकवण महाराष्ट्र विसरला. पण त्याच वेळीं एका समर्थ भ्रमंतीकारानें महाराष्ट्राला संदेश दिला : “ उदंड देशाटण करावें ! ”

हा थोर भटक्या आपल्या बालवयांत ऐन लग्नमंडपांतून पळून गेला. आपल्या देशाटनाला त्यानें येथूनच प्रारंभ केला म्हणा ना ! जांब ते पंचवटीचें अंतर त्या बालभ्रमंतीकारानें कसें पार केलें असेल त्याचा तपशील आज सांपडत नाहीं. तरी पण तें एक विलक्षण साहसकर्म होतें यांत कांहींच शंका नाहीं. त्यानंतर ऐन विशींत ते भारतभ्रमंतीला निघाले. उत्तरेकडील हरिद्वार, पूर्वेकडील पुरी, पश्चिमेस द्वारका आणि दक्षिण टोंक रामेश्वर अशीं चारी धामें त्यांनीं पालथी घातलीं. स्वदेश-समाज-स्थिति स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिली. म्लेंच्छांची, या देशांत आक्रमक म्हणून आलेल्या मुसलमानी म्लेंच्छांची वाढती सत्ता त्यांनीं पाहिली. समुद्रावरून येऊं पाहणारें नवें आक्रमण त्यांनीं हेरलें. त्यांच्या भ्रमंतीनेंच

हें त्यांना दाखविलें. परचक्रापासून स्वदेशाचें रक्षण करण्यासाठीं बलशाली झालें पाहिजे हें त्यांनीं ओळखलें. आणि पुऱ्या तपाची भ्रमंती-तपश्चर्या पुरी करून आल्यानंतर त्यांनीं महाराष्ट्राला पराक्रमी व बलशाली दैवतांची उपासना दिली. तालमींचे आखाडे उघडले आणि देशाच्या काना-कोपऱ्यांत आपले महंत पाठवले. समर्थांच्या भ्रमंतीनेंच हें बल आपल्याला दिलें. त्यांनीं सांगितलें :

**मूर्ख एकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो ॥**

त्यानंतर अनेक वर्षें हें पाथेय आम्हांला पुरलें. ज्या वेळीं मातृभूमीच्या स्वातंत्र्यसौभाग्याचा कुंकुमतिलक पुसला जायची वेळ आली तेव्हां एकटा बलशाली महाराष्ट्र या समरप्रसंगांत उभा ठाकला. त्याची तलवार म्यान झाली नाहीं; तुटली, पण अखेरीला ! हें सामर्थ्य त्याला समर्थांच्या भ्रमंतीपोटीं मिळालेल्या देशपरिस्थितीच्या जाणीवेंतून मिळालें.

**नाना तीर्थाटणें करावीं । नाना सामर्थ्यें वाढवावीं ॥**

हें त्या भ्रमंतीचें सार होतें. या देशाचा वारा खात, आकाशांतून येणाऱ्या संतत जलधारेखालीं चिंब होत, या देशांतील नगरानगरांतील धुळीचीं पुटें अंगावर घेत, नाना जाती-जमातीच्या अंतरंगाचा वेध घेत, व्यक्तिवैचित्र्यें, शक्तिवैचित्र्यें पहात जी भ्रमंती रामदासस्वामींनीं केली, जें देशाटन केलें त्यानेंच ही महाराष्ट्र भू बलशाली, शक्तिशाली बनविली. 'ब्राह्मणु हिंडतां बरा' हें लहानसेंच सूत्र त्यांनीं ज्ञानदानाची जबाब-दारी असलेल्या ब्राह्मणवर्गाला सांगितलें. भ्रमंती करा; डोळे उघडून चौरस, चौफेर पहात चला, हा त्या थोर भ्रमंतीकाराचा संदेश होता.

ज्या दिवशीं, ज्या क्षणीं ही त्याच्या भ्रमंतीनें दिलेली शिकवण महाराष्ट्र विसरला, त्याच दिवशीं त्याच क्षणीं तो 'महाराष्ट्र' या नामा-भिधानास पारखा झाला !

▼ ▼ ▼

## हेंच तर भ्रमंतीचें वय | ३

भ्रमंतीचा धर्म हा आजचा नाहीं, तो हजारों वर्षांपासून चालत आलेला आहे. तो जसा सनातन आहे तसाच तो आमचा, या देशाचा स्वत:चा आहे; त्यांत उसनवारी नाहीं. तो आम्हांला कोणी शिकवला नाहीं. या देशाच्या डोक्यावर असलेल्या आकाशाएवढा तो मोठा आहे. त्यांत कुठें संकुचितपणा नाहीं, जातीयता नाहीं, प्रांतीयता नाहीं. या सस्यश्यामला भूमीला वेढून राहिलेल्या सागराइतकाच तो विशाल आहे. या भ्रमंतीमध्यें गति आहे, प्रगति आहे. विजेची चपलता आहे. मृत्यूलाहि भीक न घालण्याची निर्भीकता आहे. खऱ्या भ्रमंतिला कोणी अडवूं शकत नाहीं. खरा भ्रमंतीकार कुठें अडत नाहीं. आणि संकटांशिवाय त्याच्या भ्रमंतीला खरी चवहि नाहीं. शेवटीं रहाणार आहेत भ्रमंतीच्या आठवणी. ज्या आठवणीनें ऐकणाऱ्यांनीं रोमहर्षित व्हावें, पुलकित व्हावें. या आठवणींनीं ऐकणाऱ्याला अद्भुताच्या आसमन्तांत न्यावें; साहसाकडे, शौर्याकडे न्यावें.

साहस व शौर्य हाच ज्याचा स्थायी भाव तो तारुण्याचा काल हाच खरा भ्रमंतीचा काल. शरिराचा रंग बदलत असतांना त्याच्या मनाचाहि रंग बदलतो असा हा काल. कलिकालालाहि भीक न घालणारें मन त्याच्या कुडींत असतें. हीच वेळ असते इतस्तत: भटकायचा, बाहेर पडण्याची. एका बाजूनें, याच वेळीं घराची, स्थैर्याची मित्र-मैत्रिणींच्या सहवासाची ऊब जिवाला ओढ लावीत असते. पण हा सोन्यासारखा काल एकदां का घराच्या चार भिंतींत स्वत:ला कोंडून घेऊन काढला कीं मग घराचे पाश दूर करणें फार कठीण जातें. भ्रमंतीची दीक्षा घेण्याचें हेंच वय. तारुण्याचा पहिला बहर भ्रमंतींत जिरवायचा.

**सैर कर दुनियाकी गाफिल,**
**जिन्दगानी फिर कहाँ ?**
**जिन्दगी और कुछ रही,**
**तो नौजवानी फिर कहाँ ॥**

एकदांच मिळणाऱ्या नरजन्मांत तारुण्यहि एकदांच मिळतें. तें भ्रमंतीला दिलें नाहीं तर मोठी संधि गमावल्यासारखी होईल.

शालान्त परीक्षा झाली. आणि आतां लांब मुदतीची सुटी झाली आहे. घरांतून बाहेर पडण्यासाठीं हा काळ किती छान आहे ! साधारणपणें साहित्य, इतिहास, भूगोल अभ्यासला गेला आहे. आपल्या देशाच्या ज्या भूभागाचा पुस्तकांतून आपल्याला परिचय झाला आहे तो ओढ लावणारा भूप्रदेश आतां पहायला मिळणार आहे. पद्मिनीच्या अमर बलिदानानें पुनीत झालेला चितोडगड. ग्वाल्हेर काल्पीच्या रस्त्यावर इंग्रजांशीं लढतां लढतां धारातीर्थी पडलेल्या राणी लक्ष्मीची समाधि. बालकृष्णाच्या बाल-लीलांनीं मोहरलेल्या यमुनेचा आणि मथुरा-वृंदावनाचा पवित्र परिसर. मराठ्यांच्या अस्मितेचें दर्शन घडविणारें पावन पानिपत. आधुनिक भारतां-तील विज्ञानाच्या गतीनें धांवणाऱ्या उद्योगशाळा व प्रयोगशाळा. आम्हीं अडविलेले प्रचंड जलौघ व त्यावर पोसलेल्या बागा नि शेतमळे. या विशालकाय देशांत पहाण्यासारखें खूप आहे; पहाण्याची दृष्टि मात्र हवी. आणि ही दृष्टि येण्यासाठीं तुम्हांला ज्या वयांत ही दृष्टि येते तें वय येणें महत्त्वाचें.

वय १८ ते २० हा भ्रमंतीला अगदीं योग्य असा काल आहे. मातृभाषेचें यथासांग अध्ययन तुम्ही केलेलें असतें. इंग्रजी, हिंदी अशा दोन भाषाहि अवगत केलेल्या असतात. तुम्हांला सौंदर्य कळत असतें. त्याची जाणीव

झालेली असते. आणि तुम्ही जें पाहणार आहांत तें कल्पनेनें नजरेसमोर आणण्याचें सामर्थ्य तुम्हांला या वयांत आलेलें असतें.

वयाइतक्याच आणखी कांहीं गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तुम्ही देशाटनाला निघणार ना? अबूचा पहाड चढून दिलवाड्याचें मंदिर पहायचें आहे ना तुम्हांला? देवप्रयाग येथील भागीरथी आणि अलकनंदा यांचा संगम बघायचा आहे ना तुम्हांस? बद्रीनाथाचें अद्‌भुतरम्य दर्शन घ्यायचें आहे ना तुम्हांला? मग त्यासाठीं सुदृढ, सकस मन हवें.–शरीरहि! स्वावलंबनाची तयारी हवी. सात आठ शेर वजन पाठीवर घेऊन दहा दहा मैल जाण्याची ईर्ष्या हवी. जें भव्योत्कट आणि रोमहर्षक पहाण्याचा तुम्ही ध्यास घेणार आहांत, घेतला आहांत तें राजमार्गावर नाहीं, तो सुगम सुपथ नाहीं. त्यासाठीं प्रदीर्घ वाटचाल करायला हवी, कठीण चढण चढायला हवी. आणि अशा वाटचालीच्या, श्रमाच्या पार्श्वभूमीवर तें निसर्गाचें दर्शन अधिक भव्योत्कट भासतें. खऱ्या तहानलेल्यासच पाण्याची माधुरी कळते.

अशा वाटचालीचा सराव हवा. पण, महाराष्ट्राच्या सुपुत्रांना ही चिंता कशाला? केवढा सह्याद्रि पसरला आहे समोर! किल्लयांची केवढी धनदौलत आहे त्याच्यापाशीं. ह्या किल्लयांनीं आपला इतिहास घडविला आहे. या किल्लयांचा दगडन् दगड बोलका आहे. या दगडांना पाहून जो बोलणार नाहीं, हंसणार नाहीं, जुनें वैभव आठवून जो व्याकुळ होणार नाहीं तोच खरा दगड! या सह्याद्रीचे घाट, त्याच्यांतील दऱ्याखोरीं आणि दुर्गम वाटा या साऱ्यांची मोहिनी घेऊन देशाटनाची प्राथमिक तयारी सह्याद्रीच्या परिसरांत तुम्हीं केली पाहिजे. सहयाद्रीच्या वाऱ्यावर तुमच्याजवळ असलेल्या बांसरींतून सहयाद्रीच्या वाऱ्याशीं मेळ घेणारी सुरावट तुम्हांला काढतां आली पाहिजे. निसर्गाच्या सान्निध्यांत, मित्रांच्या मेळाव्यांत ही बांसरी अपार आनंद निर्माण करते. अनोळख्यांची ओळख

करून देते. अपरिचितांचा परिचय करून देते. तुमच्यांत व त्यांच्यांत जवळीक निर्माण करते.

खिशांत छोटीशी वही असेलच ना तुमच्या–शक्य तर ड्रॉइंगपेपरची नाहींतर साध्याच जाड कागदाची. त्या वहीवर तुम्ही पाहिलेल्या पडक्या किल्ल्याचें साधेंसें रेखांकन तुम्हांला करतां आलें तर किती छान होईल ! तुमची ती स्मृति कायमची रेखाबद्ध होऊन राहील. एकाद्या मंदिराचा कळस, छोट्यामोठ्या वास्तू उराशीं घेऊन राहिलेला नदीकांठ, एकुलता अबोल डोह आणि त्याच्या आश्रयानें राहिलेलें झाड, दूर ढगांशीं दोस्ती करायला निघालेला डोंगराचा सुळका, एकादी बोलकी समाधि. अशा अनेक वस्तु तुम्ही त्या छोट्या वहींत रेखाटूं शकाल. तुमच्या एकटेपणांत ही वही आणि हीं रेखाचित्रें वहींत येतांनाचा आनंद व समाधान तुम्हांला मिळवून देईल. आणि अनेक वर्षांनीं तीं रेखाचित्रें तुम्हांला पुनःप्रत्ययाचा आनंदहि मिळवून देतील.

आतां देशाटनाचे प्रत्यक्ष प्राथमिक धडे घ्यायचे. सह्याद्रीच्या घसरगुंडीवर घसरत कां होईना पश्चिम सागराकडे उड्या घेत जाणाऱ्या सह्याद्रिकन्यकांचें दर्शन तुम्हीं घेतलें पाहिजे. त्या शीतल जलाचें स्नान तुम्हांला घडलें पाहिजे. त्यांतील प्रपातांच्या पांढऱ्या सफेत धारांखालीं उभें राहून तुमचा शारीरिक, मानसिक मळ धुवून गेला पाहिजे. अशा वाटचालींतून तुमचें मुठीएवढें पोर काळीज त्या विशाल सह्याद्रीएवढें थोर होईल. त्याच्या अंगा-खांद्यावरून खेळून तें बलशाली होईल. आपलें महाराष्ट्र राज्य त्याच्या आश्रयानें आकाराला आलें. सख्या सह्याद्रीच्या कुशींत तें साकार झालें. महाराष्ट्रावर विखाराचा वर्षाव करणारे त्याच्या दगडी छातीपुढें हतप्रभ झाले. मोंगलांचें कित्येक सरदार आणि सैन्येंच्या सैन्यें त्याच्या झाडापानांनीं गिळून टाकलीं. अशा या सख्या सह्याद्रीला

प्रथम मानाचा मुजरा करा. त्याला मिठी घाला, त्याच्या अंगाखांद्यावर खेळा आणि मग उदंड देशाटनाला निघा.

पैठणच्या विद्येचा वारसा बरोबर घेऊन जा. एकनाथांच्या भागवताची शिदोरी बरोबर घ्या. तुका-रामदासांचा हितोपदेश ध्यानीं घ्या. अजंठयाच्या सौंदर्यस्मृती मनांत बाळगा. ठायीं ठायीं विखुरलेल्या पावन धारातीर्थांच्या कथा आठवणींत घेऊन निघा. अनुपम गोमांतकांतील फेसाळत्या दुग्ध-धवल धारा आठवत निघा. ज्ञानेश-नामदेवानें पंढरीच्या विद्यापीठांत राखलेलें पाथेय घेऊन निघा. दानशूर, विद्याप्रेमी, महाराष्ट्राचे वारसदार म्हणून निघा. ज्याला शरण येऊन मांडीवर गनिमानेंहि सुखानें झोपावें त्या इमानी, नेकदार देशाचे पाईक म्हणून निघा. परस्त्री मातेसमान मान-णाऱ्या सच्छीलतेचे वारस म्हणून निघा. दगडाधोंड्याच्या आणि फला-फुलांच्या, शिवाजीच्या, संभाजीच्या, जनाबाईच्या नि बहिणाबाईच्या, आगरकर नि टिळकांच्या महाराष्ट्राचे अभिमानी म्हणून निघा. गंगा-सिंधूंच्या पावन परिसरांत आणि राजस्थानच्या मरुभूमींत, अशोकाच्या ज्ञानभूमि उडिसांत, म्हैसूरच्या चंदनसुगंधित प्रदेशांत, पराक्रमी पंजाबच्या भूमींत, वैशालीच्या ज्ञानपीठांत, कुठेंहि, कुठेंही गेलांत तरी हा महा-राष्ट्राचा थोर वारसा सतत मनांत ठेवा, सतत जागृत ठेवा. अखिल भारतभूमींत तुम्ही कुठेंही परके वाटतां कामा नये, उपरे वाटतां कामा नये, उदासीन वा भिडस्त वाटतां कामा नयेत. हाच तुम्हांला देशाटनाला निघतांना सख्या सहयाद्रीनें दिलेला सांगावा.

▼ ▼ ▼

## हा इतिहास ध्यानांत ठेवा | ४

या देशांतील प्रत्येक दगडाला, चिऱ्याला इतिहास आहे. समाधी आणि त्या समाधीवर छाया ढाळणारे वृक्ष हा इतिहास तुम्हाला सांगतील. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या महाकाय देशांत ज्यानें इतिहास घडविला नाहीं असा भूभाग नाहीं. हा इतिहास केवळ लढायांचा नसेल, सांस्कृतिक असेल. एकाद्या गांवाला थोर कलेचा वारसा असेल. एकाद्या गांवकुसाला पडका किल्ला असेल, तर एकाद्या नगराच्या नदीकांठावर शिलालेखांनीं भरलेली वास्तु असेल. हें सारें पाहण्यासाठीं आपल्याला डोळे उघडे ठेवलेच पाहिजेत. तसेंच आपलें मन पण सजग असलें पाहिजे. त्या भूमीचा इतिहास तुम्हीं वाचला असेल. तुम्हांला तो आठवत असेल तर, तरच तुमचें मन त्या वास्तूला भेटायला आतुर राहील. तरच डोळे जागते राहतील. देशज्ञान महत्त्वाचें आहे. इतिहास आणि भूगोल दोन्हींची जाणीव पाहिजे. त्या इतिहासाचें वाचन असें झालें पाहिजे कीं, त्या भूभागावर तुमची भक्ति जडली पाहिजे. ती संस्कृति तुम्हांला आपली वाटली पाहिजे.

मेवाडचा इतिहास, पंजाबचा इतिहास, त्यांच्या-आपल्यांत अनेक योजनांचें अंतर असूनहि आपला वाटतो याचा अर्थ तेथील रसरसत्या पराक्रमांत आपल्या पराक्रमी महाराष्ट्राचें प्रतिबिंब आपल्याला दिसतें. पद्मिनीच्या आत्मसमर्पणांत आपल्या येथील त्रिंबकजी डेंगळ्याच्या वीरपत्नीचें साहस दिसतें. आणि हें सर्व सोडलें तरी आपण कुठेंहि गेलों तरी तो भूप्रदेश आपलाच आहे असें वाटावें अशा भारतीय संस्कृतीचे आपण वारसदार असल्यानें, आपण सगळेच याच देशाचे रहिवासी असल्यानें त्याचा इतिहास तो आपला इतिहास असेंच आपल्याला वाटलें पाहिजे. रामायण-महाभारतावर जसें

साऱ्या देशाचें प्रेम तसेंच या देशावर साऱ्यांचें प्रेम असलें पाहिजे. राम-कृष्ण आणि सीता-द्रौपदी साऱ्या भारताच्या आहेत. भारतीय संस्कृतीनेंच ही अभिन्नता व अद्वैत आपणास दिलें आहे. ही भारतीय संस्कृति कशी घडली, इथेंच कां घडली, आकाराला केव्हां आली, तिला तडे कुठें गेले, कसे गेले यांचें सतत चिंतन या देशाटनांत राहिलें पाहिजे. हें चिंतन आपल्याला नवीन दृष्टि देईल. विकासाचा नवा मार्ग खुला करील.

▼ ▼ ▼

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८८० दि
क्रमांक ९८२९ नों दि १८-३-६२

समोर निळा दर्या हेलावतो आहे. असीम अंतरापर्यंत केवळ तें निळें पाणी फैलावलें आहे. आपल्या देशाला ही देणगी आहे. दोन्ही बाजूंनीं हा अफाट किनारा लाभला आहे. या अशा किनाऱ्यावर पुरी, कन्या-कुमारी, रामेश्वर आदि पावनतीर्थे उभीं आहेत. या पावनतीर्थांचें दर्शन घेऊन कांठच्या शिलाखंडावर बसून समोरच्या नीलवर्ण सागराकडे नुसतें अनिमिष नेत्रांनीं पहात रहावें! समोरच्या सागरावर उसळणाऱ्या लाटां-प्रमाणें मनांत विचारलहरी उसळतात. कित्येक वर्षें आम्ही समजत आलों कीं, हा सागर ओलांडून या देशावर कोणीहि आक्रमण करणार नाहीं. या देशाला एवढी विस्तृत किनारपट्टी लाभूनहि आम्ही पट्टीचे दर्यावर्दी झालों नाहींत. समुद्र आम्ही त्याज्य कां ठरविला ? इतिहासांत चोल सम्राटाशिवाय हा प्रयत्न कोणीहि केल्याचें कसें ऐकिवांत नाहीं ? या सुवर्णभूमींत व्यापारासाठीं परदेशांतून अनेक जहाजें यायचीं जायचीं. पण आमच्या एकाहि सम्राटाला या नौकानयन-शास्त्राविषयीं कां कुतूहल निर्माण झालें नाहीं ? समुद्रोल्लंघन तर रामानें केलें होतें. दर्यावर आपली सत्ता असावी हें आपल्या शिवबानें ओळखलें. पण तोंपर्यंत लाटांवर स्वार होऊन कावेबाज टोपीकर आपल्या दारांत येऊन उभाहि राहिला होता. शिवाजीची दूरदृष्टि तरीहि श्रेष्ठ ठरली. अनेक वर्षांनीं कां होईना पण दर्यावर या देशाचीं तारवें हिंडूं लागलीं. त्याचा अभिमान त्या पूर्व किनाऱ्याला वाटूं लागला. त्याच्या लाटांवर मराठ्यांचें आरमार बघता बघतां पोसलें, शेर झालें. पण पुढें पेशव्यांची दृष्टि अंधुक झाली. ज्याला लढत देण्यासाठीं शिवप्रभूंनीं मराठी आरमार स्थापन केलें त्यांचीच मदत घेऊन इंग्रजांना थरकांपविणारें मराठ्यांचें आरमार रसातळाला मिळविलें. समोरचा सागर हीच दुःखद कहाणी आपल्याला ऐकवतो; आणि ज्या शिळेच्या आधारानें आपण बसलेलों असतों त्या शिळेसारखेंच आपलें मन जड जड होऊन जातें.

▼ ▼ ▼

मागच्या इतिहासाच्या सुवर्णसीमेवर नेणारे कित्येक प्रसंग या देशाटनांत ठायीं ठायीं भेटतात.

दिल्लीच्या लालकिल्ल्याची शान बघत असतांना असेंच मन व्यग्र होतें. नव्या दिल्लीची ऐट पाहून त्या पार्श्वभूमीवर जेव्हां लाल किल्ल्याचें दर्शन आपण घेतों तेव्हां तर हा विचार मनांत अधिक तीव्रतेनें येतो. या दिल्लीनें कित्येक राजवंशांचे उदयास्त पाहिले. कधीं सम्राज्ञीचें वैभव तिनें उपभोगिलें तर कधीं ती नांवाची राज्ञी होऊन राहिली. दिल्लीच्या इतिहासाशीं महाराष्ट्राचा शतकाशतकांचा संबंध आहे. याच गादीनें मराठ्यांचे 'स्वराज्य' धुळीला मिळविण्यासाठीं जंग जंग पछाडले पण श्रीसमर्थांच्या आशीर्वादानें आणि शिवप्रभूंच्या पुण्याईनें हा राष्ट्राच्या बलसंपन्न तुकडा जागता राहिला. आणि त्यानंतर वेळ अशी आली कीं, त्या ढिल्या दिल्लीच्या रक्षणासाठीं मराठी गादीच धांवून आली; एकदां नाहीं अनेकदां. अंगावर घेतलेला अनाथ दिल्लीचा भार सांभाळण्यासाठीं अनेकदां मराठ्यांना आपलें रक्त सांडावें लागलें.

महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त होता. आतां ते दिवस कुठें गेले? ती अस्मिता कुठें गेली? महाराष्ट्र म्लान कां झाला? आम्ही एकवार अटकेपार गेलों होतों. मथुरा-वृंदावनची पावन भूमि मुसलमानांच्या आक्रमणांतून मुक्त करण्याचें थोर कार्य सदाशिवराव पेशव्यानें आपला जीव पणाला लावून केलें होतें. त्याच उद्योगांत पानिपत पुण्यपथ झालें. भारतांतील दूरदूरच्या भूप्रदेशांत मराठ्यांचा भगवा झेंडा दिमाखानें नाचला. मानानें अभिमानानें उभा ठाकला. तेव्हांहि हें देशाटन मराठ्यांनीं केलें. या त्यांच्या देशाटनाला अर्थ होता. हें देशाटन होतें

पराक्रमासाठीं. हें देशाटन होतें ढिल्या दिल्लीच्या रक्षणासाठीं. हें देशाटन होतें मथुरा-वृंदावनाची पुण्यभू वांचविण्यासाठीं.

वैशालीच्या वैराण प्रदेशांत आणि तेथील शिलारूपानें असलेल्या अवशेषांत या देशाचा गौरवपूर्ण इतिहास दडला आहे. गणराज्याची कल्पना या देशाला वैशालीनें दिली. एकदां महात्मा बुद्धानेंच मगध सम्राटाला सांगितलें होतें कीं, वैशाली कोणाची दासी होणार नाहीं; कारण तिथें लोक राज्य करतात, लोक परिषदा बोलावितात. तिथें प्रत्येक निर्णय मतदानानें घेतला जात होता. शेंकडों वर्षांनें भारतांत जें एक नवें राज्य आकाराला येणार होतें त्याचीं हीं पदचिन्हें तर नव्हतीं ?

वैशालीला मानाचा मुजरा देण्यास दुसरेंहि एक कारण आहे. या वैशालीचा इतिहास म्हणजे प्राचीन भारताचा इतिहास असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. ही वैशालीच एकदां भारताची खड्ग-हस्त होती. सिकन्दराचें आक्रमण याच वैशालीनें परतवून लावलें होतें. एक दक्षिण सोडली तर सारा भारत तेव्हां वैशालीच्या ताब्यांत होता. आज वैशालीच्या दिमाखाची आठवण देणारे शिलाखंड पाहून तुमचें मन द्रवलें पाहिजे. तो इतिहास तुमच्या डोळ्यांसमोर उभा राहिला पाहिजे. आणि त्या शिलाखंडाच्या मागें असलेल्या गौरवास्पद इतिहासाचा तुम्ही शोध घेतला पाहिजे.

नागार्जुनकोंडा, नालंदा, तक्षशीला येथील भव्य ग्रंथालयांचे अवशेष पाहूनहि मनाला असेंच रडूं फुटतें. केवढा विशाल ग्रंथसमूह नांदत होता या भिंतींत ! या ग्रंथसंग्रहाच्या वेडानें फुलांकडे धांवत येणाऱ्या मुंग्या-प्रमाणें देशोदेशींचे पंडित येथें गोळा होत. अखंड ज्ञानसाधना येथें चाले. त्यासाठींच तर चिनी, तिबेटी यात्रेकरू दुर्गम पहाड पार करून येथें आले. इथें शिकायला येणारे विद्यार्थी विनय घेऊन येत. तो या ज्ञान-पीठाचा नियमच होता. 'विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि ।' येथें शिकून, ज्ञान

मिळवून अभिमानानें मान उंच करून ते विद्यार्थी येथून परत जात. ज्ञानासाठीं अशी मेहनत घेणाऱ्या पिढ्याच्या पिढया येथें अध्ययन करून गेल्या. त्यागी, परिश्रमी विद्यार्थिजीवन आजहि तेथें स्मृतीनें अनुभवतां येईल, जाणिवेनें अनुसरणीय वाटेल. नालंदा, तक्षशिला हाच संदेश देतांना आढळतील.

▼ ▼ ▼

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ९२२८५

वाहती नदी पाहिली म्हणजे वाटतें कीं भ्रमंतीशास्त्र जिच्यावर पोसलें ती एकमेव पोषणकर्ती म्हणजे नदी. नद्यांचे उगम पाहण्यासाठीं माणसें प्रथम संचाराला बाहेर पडलीं. नदीच्या पाण्यानें ही मोहिनी त्यांच्या मनाला घातली. त्यांतून तें धाडस जन्माला आलें. नदीच्या कांठानें लागणारा अज्ञात, मनोरम प्रदेश त्यांना पुढें पुढें नेत राहिला. नदीच्या पाण्यावर पोसलेलीं जंगलें आणि त्यांतील पशुपक्षी यांनीं हें मानवी मनावरील आकर्षण वाढवीत नेलें. आपल्या भारतीय संस्कृतीचा इतिहास या नद्यांच्या नीलधवल नि श्यामसुंदर सलिलांनीं लिहिला आहे. या नद्यांच्या पाण्यावर आपली संस्कृति जन्मली, वाढली, आकाराला आली. गंगेच्या कांठावर रामायण-महाभारताचा जन्म झाला. या महाकाव्यांतील नायक व त्यांचें उदात्त जीवन याच नद्यांच्या पवित्र पाण्याइतकें निर्मल ठरलें. या नद्यांवर जन्माला आलेलीं तीर्थें भ्रमंतीचा विषय झालीं. अनादि कालापासून या तीर्थांच्या यात्रा सुरू झाल्या. गौतमबुद्ध, शंकराचार्य, वल्लभाचार्य याच तीर्थयात्रांनीं पुढें आले. याच तीर्थांनीं धार्मिक आंदोलनें घडविलीं. पंढरपूरच्या वाळवंटांत दर आषाढीला जमणारे दोन लाख वारकरी आणि गंगेवर कुंभमेळ्यासाठीं जमणारे चाळीस लाख यात्रेकरू ही या तीर्थस्थलांच्या जिवंतपणाची साक्षात् खूण.

या नद्यांचें पाणी पिणारांनींच आपलीं धर्मशास्त्रें, आध्यात्मिक शास्त्रें, साहित्यशास्त्रें यांच्या रचना केल्या. भवभूती आणि कालिदास गंगेच्या पाण्यावर वाढले. एकनाथ नि रामदास गोदेच्या पाण्यावर पोसले. मोठाले राजवंश या नद्यांनीं वाढविले; आणि वेळ येतांच वाहवूनहि नेले. नदी असो, धबधबा असो तेथें आम्ही परमेश्वर पाहिला. त्याला तीर्थाचें स्थान दिलें. स्थळाची रमणीयता पाहिली कीं आम्हांला ती जागा तीर्थाची

वाटतें. भगिनी निवेदिता म्हणतात : 'कोठलेंहि रमणीय भव्योत्कट दृश्य पाहिलें कीं, भारतीय हृदयाला वाटतें, गाईनें वासराला बोलवावें त्याप्रमाणें परमात्मा जीवात्म्याला बोलावीत आहे. इंग्रज त्याच ठिकाणीं सुखविलासाचीं आमोद-प्रमोदाचीं स्थानें उभारील, तर त्या ठिकाणीं भारतीय देवळें उभारील. चित्रविचित्र सुखविलास वा मौजमजा उडविण्याऐवजीं भारतीय अशा स्थानीं तपश्चर्या करील'. निसर्गाचा भव्यपणा या ठिकाणीं मानवालाहि भव्य करतो. त्याच्या सान्निन्यांत यावेळीं भव्य, दिव्य व उदात्त एवढेंच काय तें शिल्लक राहतें आणि बाकीचें अमंगळ त्या नदीच्या पाण्याबरोबर वाहत जातें.

या नश्वर जगांत अखेरीला दोनच शाश्वत राहिलीं—एक नदी आणि दुसरा कवि. सौंदर्य, सामर्थ्य, पराक्रम, श्रीमंती सारें धुऊन गेलें. वाहत्या जलौघांत टिकलें तें रामायण; त्याच्या एकवचनी, एकपत्नी नायकाची भव्योदात्त कथा.

दोन नद्यांच्या संगमावर संस्कृतिसंगमहि घडला. गंगेचा इतिहास या दृष्टीनें रोचक आहे. मुसलमान राजांनीं या देशावर आक्रमण केलें पण कांहीं मुसलमान कवींनीं आणि संतांनीं कृष्णभक्ति केली. त्यांचें तें सूफी काव्य या नदीवर जन्माला आलें.

आज याच नद्यांच्या जलौघावर मोठमोठीं धरणें उभीं राहिलीं आहेत. त्या वेळीं संस्कृति पोसली, फुलवली; आज तेच जलौघ आमचें जीवन सुसंपन्न करण्यासाठीं धांवत आहेत. त्यांच्या पाण्यांतून निर्माण होणारी शक्ति आतां नव्या रीतीनें शेतें पिकवणार आहे, बागा फुलवणार आहे, घरांत आणि गांवांत उजेड आणणार आहे.

नदी वाहती, पर्वत स्थिर. जणुं हजारों वर्षें यात्रा करून आतां तपश्चर्येला बसलेला महान् ऋषि. नदी वाहती असली तरी ती या पर्वताचीच कन्या— भ्रमंती हा तिचा धर्मच.

अशाच एका पर्वतानें प्रलयकालीं जगबुडीच्या वेळीं मनूला वांचविलें. त्याची होडी अशा एका पर्वताच्या आधारानेंच राहिली. आणि तिथून पुन्हां नवनिर्मितीला प्रारंभ झाला. नव्या जगाच्या निर्माणाचें श्रेय अशा एका पर्वताचें आहे.

पर्वत हा प्रथमपासूनच रक्षणकार्याची भूमिका घेऊन उभा राहिला आहे. डोंगरांनीं वेढलेल्या प्रदेशांत खेडींच्या खेडीं आकाराला आलीं. याच डोंगरांनीं नद्यांचे ओघ अडवून धरणें दिलीं. याच डोंगराच्या पोटांत विहार जन्माला आले. विहार आणि गुहा खोदण्यास गेलेल्यांना तेथें नवीं खनिजें सांपडलीं.

या डोंगरांनीं आणि दगडांनीं यापेक्षांहि दुसरी मोठी संपत्ति जतन करून ठेवली. तिथल्या शिलालेखांनीं या देशाचा इतिहास जतन करून ठेवला. वेरूळ-अजंठयाच्या पाषाणांनीं या देशांतील कलागौरव सांभाळून ठेवला. महाराष्ट्रांत आणि राजपुतान्यांत याच डोंगरांनीं पराक्रमी इतिहास निर्माण केला. या दोन स्वातंत्र्यदुर्गांनीं प्रमत्त यावनी सत्तेला डोंगराचा दरारा दाखवून तिच्याशीं यशस्वी झुंज दिली. त्या दगडावर डोकें आपटून अखेरीला ती सत्ता रक्तबंबाळ झाली. या डोंगरावरील दुर्गांनीं इतिहास घडविला. या दुर्गम दुर्गांपुढें कोणाचें चाललें नाहीं. नेपोलियनला हरविणाऱ्या वेलस्लीलाहि अशा दुर्गांच्या सहाय्यानें केरळच्या केरळवर्म्यानें हरविलें. मराठयांच्या युद्धशास्त्रांत तर या डोंगरदऱ्यांना केवढें महत्त्व आलें !

अशा नद्यांना, अशा डोंगर-दऱ्यांना या देशांत काय कमी ? इथें प्रत्येक नदीला आणि प्रत्येक डोंगर-दरीला इतिहास आहे. तुमच्या गांवडोंगरापासून भारताचा मुकुट शोभणाऱ्या हिमालयापर्यंत.

हिमालय ! तें तर या देशाचें महाकाव्य. संरक्षण आणि समाधान देणारा हा देवतात्मा नगराज. या धवलवस्त्र मुनिवरानें अनेक ऋषींना

आणि तपस्वीजनांना प्रेरणा दिली. तपाची नि लोकोद्धाराची ही साक्षात् प्रेरणा. सत्य-शिव-सौंदर्याचा साक्षात्कार घडविणाऱ्या त्याच्या धवल शिखरांनीं कित्येकांना नवजीवन दिलें. व्यवहारी जगाच्या बेरकाईटपणाला, कंटाळलेल्या संतप्त, पीडित आत्म्याला नवी शक्ति, नवा विश्वास दिला.

हा हिमालय एका आगळ्या पराक्रमाचें आकर्षण ठरला. जगाच्या कानाकोपऱ्यांतून असंख्य गिर्यारोहक त्याच्या 'सरगमाथ्या'ला स्पर्श करण्यासाठीं धांवले. हिमालयानें गिर्यारोहणशास्त्राचा इतिहास निर्माण केला. गिर्यारोहणाची तो कसोटी ठरला. आणि शेवटीं त्या विश्वाच्या कळसावर ज्यावेळीं पहिलीं मानवी पदचिन्हें उमटलीं तीं भारताच्या गौरवाचीं ठरलीं. एका भारतीयाच्या पुरुषप्रयत्नांना तें भव्योत्कट यश लाभलें. तेनझिंग त्या यशाचा एक प्रमुख वांटेकरी ठरला. साऱ्या जगाच्या कौतुकाचा विषय झाला.

कित्येक युगें या हिमनगांनीं या सीमेवरून या देशाचें रक्षण केलें. आतां या हिमनगाएवढी विशाल छाती आणि तितकींच उंच मनें असलेल्या भारतीय युवकांनीं या हिमनगाचें संरक्षण करायचें आहे. 'हिमालय आमचा आहे, तो आमचाच राहील' हा महामंत्र घेऊन त्याच्या जोडीला उभें राहयचें आहे. बद्रीनाथ-मानससरोवराची यात्रा करतांना प्रत्येक भारतीयानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हा हिमनग, ही धवलधरा या देशाची आहे, केवळ या देशाचीच आहे. येथील हिमवादळें झेलीत, या थंडीपावसांत शतकानुशतकें इथें जे रहात आले, ज्यांनीं परमार्थाचें एक भव्य ज्ञानपीठ या धवल सृष्टींत निर्माण केलें त्यांचा, त्या मुमुक्षूंचा यांच्यावर हक्क आहे. ही देवभूमि त्या देवमाणसांची आहे. केवळ या दुर्गम, दुष्कर, वाटा तुडवीत ते इथें आले. या धवल भूमींत त्यापायीं कित्येकांनीं प्राण दिले. या भव्य, उदात्त परिसरांत उर्वरित आयुष्य त्यांनीं व्यतीत केलें. त्यांची ही भूमि आहे.

▼ ▼ ▼

## देशाटनांतील प्रवृत्ति आणि व्यक्ति

आपल्या डोक्यावरील आकाश आणि पायाखालची माती, खरें म्हणजे कुठेंहि गेलें तरी सारखीच. कुठेंहि जा, तोच सूर्योदय आणि तोच सूर्यास्त. तीच उषा आणि तीच निशा. तरीहि त्यांच्या सौंदर्याचीं अंगेंप्रत्यंगें, त्याची खुलावट पाहण्याचें नेत्रदीपक सुख प्रत्येक ठिकाणचें वेगळें असतें. आणि त्यासाठीं देशाटनाचीच कांस धरावी लागते.

अनेकविध चांदण्यांचीं रत्नें-मोतीं उराशीं घेऊन लखलखणाऱ्या आकाशाचें निखळ सौंदर्य चार भिंतींच्या घराच्या खिडकींतून पितां येत नाहीं. एखाद्या मंदिरापाशीं, महालापाशीं निस्तब्ध, नीरव शांतता नांदत असतांना गुदगुल्या करणाऱ्या थंडीच्या निवारणाकरितां धुनी पेटवून जवळ आपण पहुडावें आणि मग आकाशांतील त्या अप्रतिम सौंदर्याचें आकंठ पान करीत रहावें. ते तारे, ते वारे मग आपल्याशीं बोलूं लागतात.

निबिड जंगलांतील पायवाटेंतून आपला प्रवास चाललेला आहे. समोर केवळ पानाफुलांनीं, दाट जाळ्यांनीं भरलेलें जंगल. कुठें कुठें आकाशाचा तुकडा दिसत नाहीं. आपलें मन त्याच्या दर्शनासाठीं तळमळत आहे. पायवाट कधीं संपते असें आपल्याला होऊन गेलेलें आहे. मग कधीं तरी ती पायवाट संपते आणि दूर डोंगरावर लख्ख आकाश आणि पाताळांत दडणारा सविता समोर दिसतो. डोळे भरून पाहिलेल्या त्या दृश्यानें जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटतें. सोनेरी प्रकाशांत न्हाणारीं तीं दऱ्याखोरीं मनाला समाधानाचें स्नान घालतात.

समोर धुक्याचा विरळ पडदा उभा आहे. आणि त्या धुक्याच्या पडद्याआड ज्याच्यासाठीं तुम्ही मैलोमैलांची वाट तुडवीत आलांत तो धबधबा आहे. त्याच्या अगणित जलवर्षावानेंच तें धुकें निर्माण झालें आहे. आकाशांत सूर्यहि याचवेळीं दडी मारून बसला आहे. घटका पळें तुम्ही

त्या जलप्रपाताच्या दर्शनासाठीं वाट पहात उभे आहांत. कंटाळलां आहांत. वाटचालीचे श्रम त्या निराशेंत आणखी कंटाळा आणीत आहेत. आणि निराशेच्या त्या कळसावर असतांनाच तो धुक्याचा निळसर पडदा दूर होतो आहे आणि तें स्वप्न कीं माया असा प्रश्न पडतो आहे. अदृश्यांतून जणुं निर्माण झालेली ती समोरची विस्तीर्ण दरी, तें धबधब्याचें रुंद पात्र व त्याची पाताळापर्यंत जाणारी खोली आणि त्या खोलींत उडी घेणारे शुभ्रधवल जलप्रपात दृष्टीस पडतात. तें महाकाव्य आठवत आठवतच मग तुम्ही पुढच्या प्रवासास निघतां.

कुठें आकाश आणि डोंगराचे माथे एकमेकाशीं सुखसंवाद करीत आहेत. कुठें विस्तीर्ण माळावर एकलाच डेरेदार वृक्ष उभा आहे. कुठें उभ्या वाटचालींत थकून भागून आल्यावर स्वागताला कुडाची झोपडी उभी आहे. कुठें संथ जलाशयावर एक जीर्ण वृक्ष वांकून सुखदु:खाच्या कथा ऐकवीत आहे. कुठें पावसाच्या संतत धुआंधारींत आपण भिजून चिंब झाल्यावर, काकडून गेल्यावर एकाद्या मठीपाशीं तिथल्या धुनीची ऊब मिळते आहे. कुठें एकाद्या जीर्ण मंदिराच्या उध्वस्त शिलाखंडांतून वाट काढीत रक्ताळलेल्या पायांनीं विध्वंसक कालाच्या तडाक्यांतून वांचलेल्या त्या जीर्णमंदिरांत आपण प्रवेश करतों आहोंत आणि कलाकाराच्या अप्रतिम कलेचें दर्शन घडविणारी मूर्ती समोर पाहतों आहोंत.

ह्या निसर्ग आणि हीं माणसें सर्वस्वी अपरिचित. धोका देणाऱ्या पायवाटेप्रमाणें धोका देणारीं माणसेंहि भेटायचींच. तहानलेल्या पांथस्थाला पाणी मिळवून देणाऱ्या झऱ्याप्रमाणें नव्या स्थानावर आपुलकीनें आमंत्रण देणारे उदारहृदयी सुद्धां भेटायचेच. पण देशाटनांत भेटणाऱ्या विशालहृदयी निसर्गाच्या सान्निध्यांत दुष्टताहि सुष्ट होऊन जाते. तिथें जातीचें, पातीचें, पंथाचें, संप्रदायाचें, असें बंधनच रहात नाहीं. तिथें सगळे एका जातीचे. ती जात भ्रमंतीकाराची, भटक्याची.

▼ ▼ ▼

## भ्रमंतीचा उद्देश | ८

आपल्या धर्मांत आपल्याला चार पुरुषार्थ सांगितले आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारी पुरुषार्थ सारखेच श्रेष्ठ. यांतील धर्म, अर्थ आणि मोक्ष हे तिन्ही पुरुषार्थ देणारा राजमार्ग कोणता असें कोणी विचारील तर त्याला भ्रमंतीशिवाय दुसरें उत्तर नाहीं.

प्राचीनकाळीं धर्मासाठीं भ्रमंती करावी लागे; पण भ्रमंती ह्राच एक धर्म आहे. धर्मासाठीं भ्रमंती तशी अर्थासाठीं, धनासाठींहि भ्रमंति ब्रह्मचर्याश्रमांत शिक्षणासाठीं देशाटन आवश्यक होतें. शिक्षणानंतरहि व्यापारासाठीं वा मुलुखगिरिसाठीं देशाटन आवश्यक होतें. गृहस्थश्रामांतहि देशाटन केलें जात होतें. ब्रह्मचर्याश्रमांत पाहिलेली दुनिया परत पहायाची. जुने, संबंध अधिक दृढ करायचे. संन्यासाश्रमांत परत तीर्थयात्रा होत्या. आपल्या धर्मनेत्यांनींच आपल्याला ही शिकवण घालून दिली. मानवी मनाची भव्यतेची, उदात्ततेची आवड पाहून त्यांनीं हा धर्मनियम बनविला. आपल्या 'ब्राह्मण' ग्रंथांनीं "चरैवैती चरैवैती" हा संदेश आम्हांला दिला. विद्येसाठीं भ्रमंती, धनासाठीं भ्रमंती. चालणाऱ्याचें भाग्यहि चालतें. "चराति चरतो भगः ।" हा धर्मग्रंथाचा सांगावा घेऊन वैश्य व्यापाराला गेले; क्षत्रिय मुलुखगिरीसाठीं बाहेर पडले; आणि ब्राह्मण ज्ञानाच्या आदानप्रदानासाठीं सर्वत्र संचार करूं लागले. भ्रमंतीला कोण गेले नाहींत ? ज्ञानी गेले, ज्ञानार्थी गेले. शोधक संशोधक गेले. देव गेले, भक्त गेले. धर्म आणि अर्थ आणि शेवटीं मोक्षहि त्यांनीं अशा भ्रमणांतून, देशाटनांतून मिळविला.

जिथें दिव्यत्वाचा साक्षात्कार झाला तिथें त्यांनीं मोक्ष साधला. निसर्गाच्या भव्यतेनें वेडावून जाऊन त्यांनीं आत्मार्पण केलें. देहाचीं बंधनें तोडून टाकलीं. जिथें तुझें-माझें, द्वेष, द्वैत, वादविवाद, जातपात

माणूस सर्व विसरतो ती जागा एकच-या भ्रमणांतून अखेरी अखेरीला भेटणारी निसर्गाची भव्यता. इथें मृत्यु माणसाचा सखा होतो. मरणाची भीतिहि संपते आणि मृत्यूच्या भव्यतेचा, दिव्यतेचा मानवाला साक्षात्कार होतो.

अशी ही भ्रमंती आणि अशी ही भ्रमंतीची पावनगाथा :

भारताची भूमि ही भ्रमंतीकारांची भूमि आहे. ही भूमि भ्रमंतीसाठीं योग्य आहे. या भूमीला गौरवशाली इतिहास आहे. या भूमीच्या भूगोलाला वैचित्र्याचें वरदान आहे. या भूमीला सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा आहे. या भूमीवरच्या धारातीर्थांनीं या भूमीला उज्ज्वल देशभक्तीचा आणि उचित धर्माभिमानाचा सुगंध दिला आहे.

वैशालीचे ध्वस्त पाषाणखंड आणि राजस्थानच्या मरुभूमींतील जीर्ण झालेले गड दोन्हीहि पाहतांना मन गहिंवरून येतें. पानिपत, मेवाड, बरारीघाट, या सारखीं पावन तीर्थें पाहून मन भरून येतें. उडीसाच्या दगडी मूर्ती आणि त्यांतील सौंदर्य दगडालाहि सजीव करतें. त्या मूर्तींना वाणी आहे, दृष्टि आहे. या भारतांत मन रमणार नाहीं अशी जागा नाहीं. भिन्न भिन्न विचारधारांच्या संगमानें फुललेला आंध्र; ब्रह्मपुत्रेचें नृत्य श्रेष्ठ कीं मणिपुरी नृत्य श्रेष्ठ असा प्रश्न टाकणारा आसाम, रवींद्रनाथ आणि राममोहन रायची देणगी देणारा बंगाल; नालंदाची विभवस्मृति उराशीं बाळगून राहिलेला, बुद्धाच्या मंदिरांनीं फुललेला, वैशालीचें वैभव आठवणारा बिहार; नरसी मेहताच्या कवनांनीं फुललेला, गरबा नृत्यांत रंगणारा, मंदिरांचा देश गुजरात; फुलासारख्या माणसांचा काश्मीर; होड्यांचा देश केरळ; गोपुरांनीं नटलेला मद्रास; चंदनाच्या वासानें घमघमणारें, सोन्याचा पाऊस पाडणारें, वृंदावनबागेनें नटलेलें म्हैसूर; हासणाऱ्या पाषाणांची मूर्तिभूमी, आणि जगन्नाथपुरी, कोणार्कसारख्या भव्य भुवनांचें उडीसा; जालियनवाला बागेचा इतिहास भारताला

ऐकविणारा नि काबूल; कंदाहार काबीज करणारा पराक्रमी पंजाब; रजपुतांच्या बहादुरीची आणि त्यांच्या स्वार्थत्यागाची कथा सांगणारी राजस्थानची भूमि; त्यांतील तीर्थराज पुष्कर, मीराबाईच्या भक्तिरसानें ओथंबलेला मारवाड आणि मोगलांच्या इमारती-वैभवानें नटलेला उत्तर प्रदेश; हिमाचल प्रदेशासारखा पहाडी प्रदेश आणि त्यांतील वन्य जीवन. या भारतांत कुठेंहि भ्रमंती करा. इथें प्रत्येक प्रदेशावर नवें आकाश आहे. तेथील जीवन नाविन्यानें नटलेलें आहे.

हा उभा भारत फिरा. त्या त्या लोकरीतींचा अभ्यास करा. त्यांची भाषा, त्यांचे रीतिरिवाज, त्यांचीं घरें, त्यांचा पोषाख या साऱ्याचा अभ्यास करा. साऱ्याचा अभिमान बाळगा. या देशाच्या वाऱ्याचा, पाण्याचा, मातीचा नि दगडांचाहि वास तुमच्या अंगाला आला पाहिजे.

ही भ्रमंती कधीं न संपणारी आहे. स्वदेशानंतर मग परदेश. भारतीय संस्कृतीचा वारसा घेऊन आपल्याला तिथें जायचें आहे. मातृभूमीच्या वैभवाचा, भव्यतेचा वारसा घेऊन तिथेंहि आपल्याला पाऊल टाकायचें आहे. भारतीय संस्कृतीचा नंदादीप घेऊन परदेशपर्यटनाला निघायचें आहे.

सागरप्रवास वर्ज्य मानणारी पिढी आतां इतिहासांत जमा झाली; तसा आग्रह धरणारेहि गेले. देशाटनाचें वेड असलेल्या वराला पूर्वीच्या काळीं वधुपिता आपली मुलगी देत नसे. "तुम्हीहि थांबा, आम्हीहि थांबतों."–असेंच जणुं तो आपल्या भावी जामाताला सांगे. पण ते स्वत: थांबले आणि आपल्या उगवत्या भाग्यालाहि त्यांनीं थांबविलें. आपण ही चूक आतां कधींहि करणार नाहीं. पर्वत आपले, नद्या आपल्या तसा सागरहि आपलाच आहे. त्याच्या लाटांवर स्वार होऊन शेवटीं निघालेंच पाहिजे. ज्या सागराच्या साहाय्यानें परकी इथें आले, वैभवाचे धनी झाले त्या सागराचें सामर्थ्य आपल्याला कळलें आहे. ती विलक्षण शक्ति आहे; तिला ताब्यांत ठेवणारा पाहिजे. जें आपलें आहे तें आपलेंच राहिलें पाहिजे. आपल्या देशाटनाला भारताच्या तीन दिशांना पसरलेल्या अफाट सागराचें हें आवाहन आहे. सागरपर्यटनाचा जुना आधार आतां नव्यानें मिळाला पाहिजे.

▼ ▼ ▼

भ्रमंती कशासाठीं ? केवळ 'स्वान्तः सुखाय' हें उत्तर चूक नाहीं; तरीपण तें पूर्ण उत्तर नाहीं. जगांत एकट्यासाठीं तसें फार थोडें असतें. तुमच्या चांगुलपणांत सर्वांचा हात असतो. तुमच्या यशांत सर्वांचें साहाय्य असतें. तसेंच सुखाचें तें कधीं तुमचें एकट्याचें अगदीं एकट्याचें नसतें. त्यावर सर्वांचा हक्क. खऱ्या सुखाची. व्याख्या आपण हीच करूं. त्यांत सगळ्यांना सुख वाटलें पाहिजे. प्रथम त्या सुखाचा, भाग्याचा अनुभव वा साक्षात्कार तुम्हांला होत असेल इतकेंच काय तें.

आपली यात्रा सुखाची, समाधानाची व्हावी यासाठीं काय संकेत आहेत ? यात्रेंतील सुख आणि यात्रेनंतरचें सुख असे या सुखाचे दोन प्रकार. यात्रेंतील सुख, समाधान याचा अर्थ यात्रास्थळांच्या दर्शनाचा, त्या दर्शनानें मनांत उमटलेल्या प्रतिक्रियांचा आनंद. चित्रांचे रंग जसे त्यांच्या पार्श्वभूमीवर खुलतात तसेंच याचें पण. ज्या स्थळीं आपण जातों त्या स्थळाचा इतिहास, परंपरा, गौरव, लोककथा याची माहिती आपल्याला असेल तरच त्या स्थळाच्या दर्शनाचें सुख. एकादी पडकी समाधी पाहाल पण त्या समाधीमागें असलेला स्वार्थत्याग, बलिदान, प्राणार्पण, देशनिष्ठा याची कांहींच माहिती आपल्याला नसेल तर त्या समाधीचे दगड आणि इतर दगडधोंडे यांत कांहींच फरक रहाणार नाहीं. निर्विकार मनानें तुम्ही तिथून परतणार. तुमचें मन गाहिंवरणार नाहीं, जड होणार नाहीं, अभिमानानें फुलणार नाहीं. यात्रेंतील खरें समाधान मग तुमच्या वांट्याला येणारच नाहीं.

यात्रेनंतरचें समाधान अनेक संकेतावर आधारलेलें आहे. तुम्ही भ्रमंती करून आलां आहांत. कांहीं अनुभव, कांहीं अभिमान, गौरवाचा वारसा घेऊन आलां आहांत. भ्रमंती करून आलेल्या भूभागाशीं, तेथील लोकांशीं थोडीफार जवळीक करून आलां आहांत.

भ्रमंती करून आल्यानंतर आपल्या भ्रमंतीकडचें सिंहावलोकन केल्यावर जर तुम्हांला कशाचीच चुटपुट लागत नसेल तर तुम्हांला भ्रमंतीनंतरचेंहि समाधान मिळालें नाहीं असेंच म्हणावें लागेल.

भ्रमंतींत हें होतां कामा नये. ज्या स्थळीं तुम्ही जाल त्याबद्दल तुम्हांला जवळीक निर्माण झाली पाहिजे. त्या भूभागाचें, स्थानमहात्म्याचें प्रेम निरंतर तुमच्या मनांत राहिलें पाहिजे. एकाद्या जुन्या मांदिराच्या पायऱ्या चढतांना तेथील वयोवृद्ध पुजाऱ्याकडून लोककथांचा सांठा आपल्या पदरांत पाडून घेतला पाहिजे. एखाद्या मठींतील साधुसंन्याशाकडून, बुवागोसाव्याकडून त्या भूप्रदेशाच्या अद्भुततेचे रंग तुम्ही पैदा करून घेतले पाहिजेत. तेथील वाटाड्या बुवा पुजारी यांना तुम्ही बोलकें केलें पाहिजे. त्यांना बोलकें करा आणि त्यांच्याकडून गुणगौरवाचा खजिना हस्तगत करा.

भ्रमंतींत नाना चिजा हाताशीं येतात. नर्मदेंतील गोट्यापासून एकाद्या जुन्या इतिहासकालीन राजवंशाच्या नाण्यापर्यंत याचा संग्रह करायला कधीं चुकूं नका, विसरूं नका. कोणी देऊं केलेलें जुनें पोथी-पुस्तक कधीं अव्हेरूं नका. त्याला ओझें समजूं नका, भ्रमंतीनंतर हें ओझें, या प्रथमदर्शनीं कवडीकिंमतीच्या वाटणाऱ्या वस्तूच पुढें खरें समाधान देतात, अनमोल ठरतात.

भ्रमंतींत रोजनिशी लिहिणें हें एक या शास्त्राचें आवश्यक अंग आहे. केवळ कमींत कमी त्या स्थलवर्णनाचें, स्थानमहात्म्याचें टिपण तरी केलेलें असावें. कधीं काळीं या भ्रमंतीवर तुम्हांला लिहावेंसें वाटलें तर ही रोजनिशी मदतीला हात जोडून हजर होईल.

भ्रमंतींतील स्मृति हें तर भ्रमंतीनंतरचें महान समाधान. आपल्या चार भिंतींच्या विश्वांत हें समाधान आपल्याला या स्मृतीचें तें विश्वच देऊं शकतें. तो गंगाकांठ, तीं हिमनगाचीं शुभ्रधवल शिखरें, तो धनुष-

१२२८५

कोडीची उचंबळणारा सागर, त्या वास्तू, ते डोंगर हें सारें आपण इथें आणि कुठेंहि स्मृतिरूपानें पाहूं शकतों. मग एखाद्या मुळेमुठेच्या कांठावर उभें राहिलें तरी काश्मीरच्या दाल सरोवरांत केलेला स्वैर विहार आणि यमुनाजळांत केलेलें पावनस्नान आठवतें. एकादा लहानसा स्तंभ पाहतांना अचानक चितोडचा तो अविस्मरणीय विजयस्तंभ आठवतो. कुठेंहि कधींहि हीं आठवणीचीं गोंडस गोड बालकें आपल्या-भोंवतीं गर्दी करतात. माना उंचावून आपल्याला जवळ घ्यावें म्हणून आर्जवें करतात. या स्मृति अशा कां बोलतात ? कशा आठवतात ? तुम्हीं भ्रमंतींत पाहिलेल्या स्थानांचा, स्थळांचा निरोप घेतांना मित्राच्या जिव्हाळ्यानें परत येण्याचें अभिवचन तुम्ही त्यांना दिलेलें असतें. तुमच्यासारखींच तीं स्थानेंहि तुम्हांला पुनःपुन्हा भेटायला व्याकुळ झालेलीं असतात.

अशा या आपणाला याद देणाऱ्या, हाकारणाऱ्या, बोलावणाऱ्या स्मृति. या स्मृतींची वंचना करायची का ? ह्या स्मृतींना शब्दरूप देणें महत्त्वाचें आहे. शब्दरूप झालेल्या ह्या स्मृति म्हणजे पुढील भ्रमंती-कारांचें पाथेय, त्यांचा मार्गदर्शक, त्यांचा मित्र. ही या स्मृतींची खरी भूमिका. आणि ह्या स्मृतींनीं एकाद्याला भ्रमंतीला उद्युक्त केलें किंवा एकाद्याच्या भ्रमंतींत त्या मार्गदर्शक ठरल्या तर त्याचें त्या सांगणाऱ्या भ्रमंतीकाराला केवढें सुख ! तुमच्या या स्मृतींनीं तुम्ही नव्या भ्रमंती-काराला जन्म देत असतां त्याला भ्रमंतीला उद्युक्त करीत असतां. नारद, परशुराम, बुद्ध, शंकराचार्य, रामदासस्वामी यांनीं दिलेल्या गौरव-शाली परंपरेला एक नव्या दमाचा गडी तुम्ही मिळवून देत असतां. आणि दिव्यानें दिवा लागावा तसा भ्रमंतीचा हा वसा एकाकडून दुसऱ्याला दिला जात असतो.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक २४८८०. निबंध
क्रमांक १४३५. ता. दि. १४-३-६२.
REFBK-0012295
REFBK-0012295

दर आठवड्याला एक पुस्तक आपल्या घरीं आणून टाकणारी पुस्तक-माला. सर्वसामान्य वाचक, वरच्या वर्गांतील शालेय विद्यार्थी व शिक्षक, खेड्यांतला माणूस आणि घरांतील शिक्षित स्त्री अशा सर्वांनाच बहुश्रुत करण्यासाठीं एका वर्षांत एकूण १६०० पानांचीं ५० पुस्तकें या योजनेंतून घरपोंच दिलीं जातील. आगाऊ सवलतींची किंमत रु. २५ फक्त

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. मुंबई २

वितरक : गोकुळ मासिक प्रकाशन

११९४ सदाशिव पेठ, पावन मारुती चौक, पुणें २